|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)**

---

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग**

---

कबचौउमवि / ७ / ४९७३ /२०१९ दिनांक १०.१०.२०१९

**मा.प्राचार्य /मा.संचालक / मा.विभाग प्रमुख**
कबचौउमविशी संलग्नित
सर्व महाविद्यालये, मान्यताप्राप्त परीसंस्था व विद्यापीठ प्रशाळा / शैक्षणिक विभाग
यांना ..

**विषय** - माहे ऑक्टो / नोव्हें/ डिसें. -२०१९ मध्ये होणाऱ्या परीक्षांचे प्रवेशपत्र (Hall Ticket) तपासणी संदर्भात ..

**महोदय / महोदया,**

माहे ऑक्टो / नोव्हें/ डिसें. - २०१९ मध्ये होणाऱ्या विद्यापीठाच्या परीक्षांचे प्रवेशपत्र (Hall Ticket) महाविद्यालयांना लवकरच वितरीत करण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने आपणांस विनंती की, विद्यार्थ्यांचे परिक्षा प्रवेशपत्र आपल्या अधिनस्थ संबंधित कर्मचारी वर्गाकडून तसेच संबंधित विद्यार्थी / विद्यार्थीनींकडून तपासून घेण्यात यावेत. यात विद्यार्थ्याचे नाव, Spelling, परिक्षा अर्जात भरलेले विषय व हॉल तिकीटावर आलेले विषय, समकक्ष विषय, विद्यार्थ्याचा फोटो व महाविद्यालयाचे नांव इत्यादी बाबी काळजीपूर्वक तपासण्यात याव्यात ही विनंती.

विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या परिक्षा प्रवेशपत्रात वरील नमूद केलेल्या बाबींबाबत काही दूरूस्ती असल्यास सदरचे परीक्षा प्रवेशपत्र (Hall Ticket) नियमित शुल्कासह परीक्षा सुरू होण्यापूर्वी तातडीने दुरूस्त करून घेण्यात यावे.

विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही विद्यार्थी परीक्षेच्यावेळी त्यांचा विषय Hall Ticket वर नमुद केलेल्या विषयांपैकी नसून दुसराच विषय उदा. मराठी ऐवजी इंग्रजी, बायोकेमेस्ट्री ऐवजी मायक्रोबायोलॉजी असल्याचे निवेदन विद्यापीठास ऐनवेळी सादर करतात. दरम्यानच्या काळात विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्जावर नमुद केल्यानुसार व त्या अनुषंगाने परीक्षा प्रवेशपत्रावर नमुद झाल्यानुसार त्या त्या संबंधीत विषयाच्या सीट समरीमध्ये त्या - त्या बैठक क्रमांकाचा उल्लेख करण्यात येऊन सीट समरी व कोऱ्या गुणयाद्या महाविद्यालयांस वितरीत झालेल्या असतात. परिणामी सदर गुणयादीवर विद्यार्थ्यांच्या बैठक क्रमांकापुढे चुकीने भरलेल्या विषयाच्या गुणांची नोंद नसल्यामुळे सदरचा निकाल Inf / राखीव ठेवले जातात.

सदर राखीव निकालांवर निकाल जाहीर करण्याची कार्यवाही करण्यासाठी महाविद्यालयाकडून अंतर्गत (C A) परीक्षेच्या उत्तरपत्रिका, अटेन्डन्स रिपोर्ट, जे.एस.आर. रिपोर्ट, विद्यार्थ्यांचे Hall Ticket, विद्यार्थ्यांचा अर्ज महाविद्यालयाचे पत्र इत्यादी बाबींची पूर्तता करावी लागते. यात विद्यार्थ्यांचा, महाविद्यालयांचा व विद्यापीठाचा वेळ खर्ची होत असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता असते.

**तसेच परीक्षेस प्रविष्ठ झालेले काही विद्यार्थी जुन्या / हायब्रीड पॅटर्नचे असतात. सदर विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यासक्रमाच्या संधी संपल्यानंतर अनुत्तीर्ण विषयाच्या त्या - त्या समकक्ष विषयाचीच परीक्षा देणे आवश्यक असते.**

**उदा.विज्ञान शाखेच्या बाबतीत BoT ३५६ B - Gardening ऐवजी BoT ३५६ C - Gardening, BOT ३६२ - Gymnosperms and Paleobotany ऐवजी BoT ३६२ - Anectomy and Embryology अशा प्रकारे विषय देणे आवश्यक असतात. तथापि, काही विद्यार्थी समकक्ष विषयांची परिक्षा न देता विषयांच्या कोडमधील एकसारखेपणा पाहून किंवा विषयांच्या नावातील साम्यता पाहून परीक्षेस प्रविष्ठ होत असतात. सदर कारणास्तव समकक्ष विषयांची परिक्षा न दिल्यामुळे सदर विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात येतात. सदर प्रकरणी विद्यार्थ्यांना, महाविद्यालयांना व विद्यापीठास विनाकारण वेळ व श्रम खर्च करावे लागतात.**

**त्यामुळे जुन्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी समकक्ष विषयांचीच परीक्षा द्यावी यासाठी विद्यार्थ्यांना समकक्ष विषय ज्ञात करण्यात येऊन, समकक्ष विषयांची माहिती / यादी महाविद्यालयांनी त्यांच्या नोटीस बोर्डवर लावावी.**

**सदर प्रकारणी दुर्लक्ष झाल्यास व परिणामी विद्यार्थ्यांचा निकाल राखीव राहिल्यास किंवा उशिराने जाहीर झाल्यास, विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस विद्यापीठ जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.**

**तसेच वर नमुद केलेली कार्यवाही यापुढे होणाऱ्या सर्व परीक्षांसाठी देखील अवलंबविण्यात यावी ही विनंती.**

आपला विश्वासू,

Bhatuprasad Prabhakar Patil

Digitally signed by Bhatuprasad Prabhakar Patil
DN: c=IN, o=Kavayitri Bahinabai Chaudhari North Mh. University, ou=Director Board of Examinations and Evaluation, cn=Bhatuprasad Prabhakar Patil, serialNumber=1c9f78a35972bc358358c30906be0f2f7473da51a8fe8bf8b5ca214dbfe20483, postalCode=425001, 2.5.4.20=503f3136f4b51bc2496a33245787fa1b54e7924915585cb1e82e24ec8c0baf75, st=Maharashtra
Date: 2019.10.10 14:30:34 +05'30'

**(भ.प्र.पाटील)**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**